# जनता सहकारी बँक लि., पुणे

**मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक**

सन्माननीय ग्राहक, सस्नेह नमस्कार.

ग्राहकांना नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून सुरक्षित बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बँक सातत्याने प्रयत्नशील आहे. बँकेची इंटरनेट बँकिंग सुविधा वापरुन बँकेस सेवा करण्याची संधी आपण दिलीत त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. ग्राहक केंद्रित अधिक चांगली सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बँकेने धोरणात्मक निर्णय घेऊन माहे ऑगस्ट 2025 पासून नवीन इंटरनेट बँकिंग सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे. इंटरनेट बँकिंग युजर्स ने नवीन सिस्टिममध्ये रजिस्ट्रेशन करण्यासाठी मेल द्वारे User Guide 2 वेळा पाठविलेले आहे. मोठ्या संख्येने युजर नवीन सिस्टिमचा वापर करीत आहेत. **नवीन सिस्टीमच्या काही विशेष सुविधा पुढीलप्रमाणे -**

नवीन सुविधेमध्ये यापूर्वी उपलब्ध असलेल्या सेवांच्या बरोबर (1) Beneficiary Add न करता रु. 10000 पर्यंत Instant Pay, (2) Beneficiary Limit Set करण्याची सुविधा, (3) On Dash board facility available to View Recent Transactions and send money to them (4) Frequent payees can be mark as Favourite Payee and showed on screen while sending money (5) Fixed Deposit and Recurring Deposit Online Opening with On Maturity Renew / Close Instruction (6) **Debit Card Management -** एटीएम कार्ड ब्लॉक / अनब्लॉक, कार्ड लिमिट सेट करणे, पिन बदलणे ई. सुविधा ॲपवर उपलब्ध आहे. (7) ऑनलाईन व्यवहारांमध्ये झालेली वाढ लक्षात घेऊन रिटेल युजर्ससाठी **डेली फंड ट्रान्सफर लिमिट 5 लाख व कॉर्पोरेट युजर्ससाठी 10 लाख करण्यात आलेली आहे.**

**ग्राहकांच्या सुविधेसाठी व सर्व युजर्सला नवीन सिस्टीममध्ये रजिस्ट्रेशन करण्याच्या दृष्टीने दोन्ही अप्लिकेशन सध्या सुरु आहेत. दि. 22 फेब्रुवारी 2026 रोजी रात्रो 12.00 पर्यंतच OLD INTERNET BANKING SERVICE सुरु असेल, त्यानंतर फक्त New Internet Banking सुरु असणार आहे.**

व्यवहाराची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने या पत्राद्वारे आपणास विनंती आहे की नवीन सुविधेमध्ये आपण त्वरित रजिस्ट्रेशन प्रोसेस पूर्ण करावी. सदर प्रोसेस User Friendly असून मेल सोबत Document जोडलेले आहे. **रिटेल व कॉर्पोरेट** युजर्ससाठी स्वतंत्र Document असून बँकेच्या वेबसाईटवर होम पेजवर उपलब्ध केलेले आहे. तसेच आपण ib_support@jsblpune.bank.in या मेल आयडीवर संपर्क साधू शकता.

आपले खातेव्यवहार असलेल्या शाखेतील सेवक देखील आपणास आवश्यक सहाय्य करण्यास उत्सुक आहेत. जुनी सिस्टीम पूर्णपणे बंद होणार असल्याने दि. 22 फेब्रुवारी पर्यंत आपण नवीन इंटरनेट बँकिंग अप्लिकेशन रजिस्ट्रेशन प्रोसेस पूर्ण करून घ्यावी, की जेणेकरून 23/02/2026 पासून बँकिंग व्यवहार करताना आपली गैरसोय होणार नाही.

नवीन इंटरनेट बँकिंग आमच्या ग्राहकांना वेगवान, अधिक सुलभ डिजीटल अनुभव देईल असा आम्हाला विश्वास आहे. याद्वारे ग्राहकांच्या गरजा या कायमच आमच्या प्रत्येक कामाच्या केंद्रस्थानी राहतील याचीही हमी आम्ही देत आहोत.

**धन्यवाद !**

**जगदीश पु. कश्यप**
मुख्य कार्यकारी अधिकारी